या सामन्यातील पहिल्या डावातही फलंदाजी करताना बेन डकेटने दमदार सुरूवात करून दिली होती. त्याने ६२ धावांची सलामी दिली होती. त्यानंतर ... सोडला. जर हा झेल सोडला नसता तर बेन डकेटचं शतक पूर्ण झालं नसतं. त्याचं शतक ४ धावांनी हुकलं असतं.

# मुकुल माधव विद्यालयाचा १५ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

रत्नागिरी, २४ जून :- फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि. यांच्याद्वारे दान केलेल्या १० एकर जागेवर मुकुल माधव फाउंडेशनच्या पुढाकाराने स्थापन झालेले मुकुल माधव विद्यालय यावर्षी आपला १५ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करत आहे. केवळ १५० विद्यार्थ्यांपासून सुरू झालेला प्रवास आज ५०० हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला आहे.

मुख्याध्यापकांनी आपल्या भाषणात सांगितले की, शाळेच्या स्थापनेपासून आजपर्यंत शिक्षण, कला, पर्यावरण, सामाजिक जबाबदारी आणि आधुनिक पायाभूत सुविधांमध्ये शाळेने उल्लेखनीय प्रगती केली आहे.

आधुनिक पायाभूत सुविधा

शाळेमध्ये सौरऊर्जा प्रकल्प, पावसाच्या पाण्याचे संकलन (रेन वॉटर हार्वेस्टिंग), वीज प्रतिबंधक यंत्रणा (लाइटनिंग अरेस्टर), आणि स्वतः चा भाजीपाला तुकडा (व्हेजिटेबल पॅच) अशा सुविधा उपलब्ध आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक शिक्षणाची अनुभूती मिळते.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

विद्यार्थ्यांना योगा, कराटे, ॲरोबिक्स, बुद्धिबळ आणि जर्मन भाषा यांचे प्रशिक्षण अतिरिक्त शुल्क न आकारता दिले जाते. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि कौशल्ये विकसित होत आहेत. विशेष अभिमानाची बाब म्हणजे, विद्यार्थिनी कु. ऐश्वर्या केळकर हिने गोखले इन्स्टिट्यूट, पुणे यांच्याकडून शिष्यवृत्ती मिळवून जर्मनीतील भाषा शिबिरात सहभाग घेतला, ही आमच्यासाठी आंतरराष्ट्रीय गौरवाची बाब आहे.

या सर्व यशामागे आमच्या मॅनेजिंग ट्रस्टी सौ. रितू प्रकाश छाब्रिया यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व व प्रेरणादायी मार्गदर्शन आहे. त्यांच्या सततच्या प्रोत्साहनामुळेच मुकुल माधव विद्यालयाने यशाची शिखरे गाठली आहेत.

मुख्याध्यापक रोहित देशपांडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, मुकुल माधव विद्यालय हे केवळ ज्ञानाचे केंद्र नसून, विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडवणारे संस्कारपीठ आहे. या यशामध्ये आमचे शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि संस्थेचे मोलाचे योगदान आहे.

